**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेत साजरा झाला आंतरराष्ट्रीय "माहिती अधिकार दिन".**

आज दि. २९.०९.२०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयात राज्य शासनाच्या निर्देशानूसार व मनपा मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय "माहिती अधिकार दिन" साजरा करण्यात आला. या प्रसंगी विभाग प्रमुख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये शासनाकडून आलेली परिपत्रके, शासन निर्णय यांचे वाचन करण्यात आले. तसेच शासनाचा कारभार लोकाभिमूख व पारदर्शक होण्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे महत्त्व व त्याबाबत सविस्तर माहिती उपस्थित अधिकार/कर्मचारी यांना देण्यात आली.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कायदा देशभरात दि. 12/10/2005 पासून लागू करण्यात आला व शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे आल्पावधीतच राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरुपात लोकाभिमुख झाला आहे. दिनांक 28 सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रात माहिती अधिकार अधिनियम 2005 या कायद्याच्या व्यापक प्रसिध्दीकरिता व प्रभावी अंमलबजावणीकरिता शासन स्तरावरुन सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. यास्तव प्रतिवर्षी 28 सप्टेंबर हा दिवस 'माहिती अधिकार दिन म्हणून राज्यभर साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा दिवस राज्य पातळीवर प्रतिवर्षी "माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा करण्यात येईल.

सामान्य प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय "माहिती अधिकार दिन" साजरा करण्यात आला.

२९.०९.२०२५